# पोलीस अधीक्षक कार्यालय, सोलापूर ग्रामीण

ईमेलआयडी-pireader.solapur.r@gmail.com
फॅक्स क्रमांक-०२१७ / २७३२००८

---

## प्रेस नोट दि. २८/०४/२०२०

### कोरोना प्रार्दुभावाच्या अनुशंगाने सोलापूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस कर्मचारी (५० पेक्षा जास्त वयोगटातील) यांच्या वैदयकीय तपासणीबाबत व बंदोबस्त कर्तव्याबाबत.

सध्दस्थितीत संपुर्ण देशात तसेच महाराष्ट्रात कोरोना (कोव्हिड १९) या संसर्गजन्य आजाराचे मोठयाप्रमाणात रूग्ण आढळून आले असून, कोरोना (कोव्हिड १९) हा संसर्गजन्य आजार असून त्याचा सोलापूर जिल्हयात संसर्ग वाढत आहे. पोलीस अधिकारी/कर्मचारी हे कोरोना विषाणुचा संसर्ग पसरु नये याकरीता अहोरात्र आपले कर्तव्य बजावत आहेत. कोरोना विषाणूचा संसर्ग हा प्रामुख्याने वयोवृध्द व्यक्तिमध्ये होत असल्याने पोलीस दलातील ५० किंवा ५० पेक्षा जास्त वयोगटातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची वैदयकीय तपासणी होणे आवश्यक आहे. याकरीता पोलीस अधीक्षक श्री. मनोज पाटील व अपर पोलीस अधीक्षक श्री.अतुल झेंडे यांचे संकल्पनेतुन

१) सोलापूर ग्रामीण जिल्हयातील ५० किंवा ५० पेक्षा जास्त वयोगट असलेल्या एकूण ४०२ पोलीस कर्मचारी यांची उपविभागनिहाय वैदयकीय तपासणी करण्यात येत आहे. सदर वैदयकीय तपासणी ही प्रामुख्याने शुगर,बी.पी.,ई.सी.जी.,श्वसनासंबधी आजार या आजारा संबधी करण्यात येत आहे. आज दि. २८/०४/२०२० रोजी बाशी उपविभागातील एकूण १३५ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची वैदयकीय तपासणी करण्यात आली आहे. त्यासोबत करमाळा उपविभागातील व मोहोळ,सांगोला,माळशिरस पोलीस ठाणेकडील ५० किंवा ५० पेक्षा जास्त वयोगट असलेल्या पोलीस कर्मचारी यांची वैदयकीय तपासणी करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरीत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची वैदयकीय तपासणी येत्या दोन दिवसात करण्यात येणार आहे.

२) वर नमूद वयोगटातील अधिकारी व कर्मचारी यांना कोरोना विषाणु संबंधीत घोषीत हॉटस्पॉट भाग, आयसोलेशन केंद्र, क्वारंटाईन केंद्र, आंतरराज्य व आंतरजिल्हा नाकाबंदी, प्रतिबंधीत क्षेत्र (कंटोन्मेंट झोन) इत्यादी कर्तव्य देण्यात येवू नये याबाबतचे आदेश सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

<u>सदरची बातमी आपले आपले लोकप्रिय दैंनिकातून प्रसिध्द होणेस विनंती आहे.</u>

प्रति,

सर्व संपादक, सोलापूर









